श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

ऋषभ गीता चतुर्थ अध्याय(भा॰म॰5.4)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
पञ्चम स्कन्धः
॥ चतुर्थोऽध्यायः ॥

श्रीशुक उवाच
अथ ह तमुत्पत्त्यैवाभिव्यज्यमानभगवल्लक्षणं(म्)
साम्योपशमवैराग्यैश्वर्यमहाविभूतिभिरनुदिन-
मेधमानानुभावं(म्) प्रकृतयः(फ्) प्रजा ब्राह्मणा
देवताश्चावनितलसमवनायातितरां(ञ्) जगृधुः ॥ 1॥

श्रीशुकाचार्य म्हणतात – नाभीच्या पुत्राचे शरीर जन्मापासूनच भगवान विष्णूंच्या वज्र, अंकुश, इत्यादी चिन्हांनी युक्त होते. समता, शांती, वैराग्य, ऐश्वर्य, इत्यादी महान गुणांमुळे त्यांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढतच होता. हे पाहून मंत्री इत्यादी अधिकारी, प्रजा, ब्राह्मण आणि देवता यांना प्रकर्षाने वाटू लागले की, यांनीच पृथ्वीचे राज्य करावे.

तस्य ह वा इत्थं(वँ) वर्ष्मणा वरीयसा बृहच्छलोकेन

चौजसा बलेन श्रिया यशसा वीर्यशौर्याभ्यां(ञ्) च

पिता ऋषभ इतीदं(न्) नाम चकार ॥ 2॥

त्यांचे सुंदर आणि सुडौल शरीर, विपुल कीर्ती, तेज, बल, ऐश्वर्य, यश, पराक्रम आणि शौर्य या गुणांमुळे महाराज नाभीने त्यांचे नाव ऋषभ (श्रेष्ठ) असे ठेवले.

तस्य हीन्द्रः(स्) स्पर्धमानो भगवान् वर्षे न ववर्ष

तदवधार्य भगवानृषभदेवो योगेश्वरः(फ्)

प्रहस्यात्मयोगमायया स्ववर्षमजनाभं(न्) नामाभ्यवर्षत् ॥ 3॥

देवराज इंद्राने एकदा ईर्ष्येमुळे त्यांच्या राज्यात पाऊस पाडला नाही, तेव्हा योगेश्वर भगवान ऋषभदेवांनी इंद्राच्या मूर्खपणाचा उपहास करून आपल्या योगमायेच्या प्रभावाने आपले राज्य – अजनाभखंडामध्ये भरपूर पाऊस पाडला.

नाभिस्तु यथाभिलषितं(म्) सुप्रजस्त्वमवरुध्यातिं-

प्रमोदभरविह्वलो गद्गदाक्षरया गिरा स्वैरं(ङ्)

गृहीतनरलोकसधर्मं(म्) भगवन्तं(म्) पुराणपुरुषं(म्)

मायाविलसितमतिर्वत्स तातेति सानुराग-

मुपलालयन् परां(न्) निर्वृतिमुपगतः ॥ 4॥

आपल्या मनासारखा उत्तम पुत्र झाल्याने नाभी अत्यंत आनंदित झाला आणि आपल्या इच्छेनुसार मनुष्यशरीर धारण करणाऱ्या पुराणपुरुष श्रीहरीचे लालन-पालन करीत त्यांच्याच लीलाविलासाने मंत्रमुग्ध होऊन "बाबा, बाळा" असे सद्गदित होऊन म्हणत त्यातच मोठे सुख मानू लागला.

विदितानुरागमापौरप्रकृति जनपदो राजा

नाभिरात्मजं(म्) समयसेतुरक्षायामभिषिच्य

ब्राह्मणेषूपनिधाय सह मेरुदेव्या विशालायां(म्)

प्रसन्ननिपुणेन तपसा समाधियोगेन

नरनारायणाख्यं(म्) भगवन्तं(वँ) वासुदेवमुपासीनः(ख्)

कालेन तन्महिमानमवाप ॥ 5॥

मंत्रिमंडळ, नागरिक आणि राष्ट्रातील जनता ऋषभदेवांवर अत्यंत प्रेम करीत आहे असे पाहून नाभिराजाने धर्ममर्यादेचे रक्षण करण्यासाठी त्यांना राज्याभिषेक करून ब्राह्मणांच्या देखरेखीवर सोपविले आणि आपण स्वतः पत्नी मेकेदेवीसह बदरिकाश्रमाला निघून गेला. तेथे इतरांना पीडा होणार नाही अशा तीव्र तपश्चर्येने आणि समाधियोगाने भगवान वासुदेवांच्या नरनारायणस्वरूपाची आराधना करीत योग्य वेळ आल्यावर त्यांच्याच स्वरूपात तो लीन होऊन गेला.

यस्य ह पाण्डवेय श्लोकावुदाहरन्ति -

को नु तत्कर्म राजर्षेर्नाभेरन्वाचरेत्पुमान् ।

अपत्यतामगाद्यस्य हरिः(श्) शुद्धेन कर्मणा ॥ 6॥

परीक्षिता, राजा नाभीच्या संबंधात ही लोकाकृती प्रसिद्ध आहे- ज्याच्या शुद्ध कर्माने संतुष्ट होऊन साक्षात श्रीहरी त्याचे पुत्र झाले होते, त्या राजर्षी नाभीच्या उदार कर्माचे अनुकरण दुसरा कोण करू शकेल?

ब्रह्मण्योऽन्यः(ख्) कुतो नाभेर्विप्रा मङ्गलपूजिताः ।

यस्य बर्हिषि यज्ञेशं(न्) दर्शयामासुरोजसा ॥ 7॥

ज्यांच्या दक्षिणा इत्यादींनी संतुष्ट होऊन ब्राह्मणांनी आपल्या मंत्रबळाने ज्याला यज्ञशाळेत यज्ञपुरुष श्रीविष्णूचे दर्शन करविले, त्या महाराज नाभीसारखा ब्राह्मणभक्तसुद्धा कोण असू शकेल?

अथ ह भगवानृषभदेवः(स्) स्ववर्षं(ङ्) कर्मक्षेत्र-

मनुमन्यमानः(फ्) प्रदर्शितगुरुकुलवासो लब्धवरै-

र्गुरुभिरनुज्ञातो गृहमेधिनां(न्) धर्माननुशिक्षमाणो

जयन्त्यामिन्द्रदत्तायामुभयलक्षणं(ङ्) कर्म-

समाम्नायाम्नातमभियुञ्जन्नात्मजानामात्मसमानानां(म्)

शतं(ञ्) जनयामास ॥ 8॥

भगवान ऋषभदेवांनी आपला देश अजनाभखंडाला कर्मभूमी मानून लोकसंग्रहासाठी काही काळपर्यंत गृहस्थी वास केला. गुरुदेवांना यथोचित दक्षिणा देऊन गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यासाठी त्यांची आज्ञा घेतली. नंतर लोकांना गृहस्थाश्रमधर्माचे शिक्षण देण्यासाठी देवराज इंद्रांनी दिलेली त्यांची कन्या जयंती हिच्याशी विवाह केला आणि श्रौत-स्मार्त अशा दोन्ही प्रकारच्या शास्त्रोपदिष्ट कर्मांचे आचरण करीत आपल्यासारख्या शंभर पुत्रांना जन्म दिला.

येषां(ङ्) खलु महायोगी भरतो ज्येष्ठः(श्) श्रेष्ठगुण

आसीद्येनेदं(वँ) वर्षं(म्) भारतमिति व्यपदिशन्ति ॥ 9॥

त्यामध्ये महायोगी भरत सर्वांत ज्येष्ठ आणि सर्वांपेक्षा अधिक गुणवंत होता. त्याच्याच नावावरून या अजनाभखंडाला लोक भारतवर्ष म्हणू लागले.

तमनु कुशावर्त इलावर्तो ब्रह्मावर्तो मलयः(ख्) केतुर्भद्रसेन

इन्द्रस्पृग्विदर्भः(ख्) कीकट इति नव नवतिप्रधानाः ॥ 10॥

त्याहून लहान कुशावर्त, इलावर्त, ब्रह्मावर्त, मलय, केतु, भद्रसेन, इंद्रस्पृक, विदर्भ आणि कीकट हे नऊ राजकुमार उरलेल्या इतर नव्वद भावांपेक्षा ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होते.

कविर्हरिरन्तरिक्षः(फ्) प्रबुद्धः(फ्) पिप्पलायनः ।

आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः(ख्) करभाजनः ॥ 11॥

इति भागवतधर्मदर्शना नव महाभागवताः(स्) तेषां(म्)

सुचरितं(म्) भगवन्महिमोपबृं(म्)हितं(वँ) वसुदेवनारदसं(वँ)वाद

मुपशमायनमुपरिष्टाद्वर्णयिष्यामः ॥ 12॥

त्यांच्यापेक्षा लहान कवी, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन हे नऊ राजकुमार भागवतधर्माचा प्रचार करणारे मोठे भागवत होते. भगवंतांच्या महिम्याने युक्त आणि परम शांतांनी परिपूर्ण अशा यांचे उत्तम चरित्र आम्ही नारद-वसुदेव संवादरूपाने पुढे (एकादश स्कंधामध्ये) सांगू.

यवीयां(म्)स एकाशीतिर्जायन्तेयाः(फ्) पितुरादेशकरा

महाशालीना महाश्रोत्रिया यज्ञशीलाः(ख्) कर्मविशुद्धा

ब्राह्मणा बभूवुः ॥ 13॥

जयन्तीचे त्यांच्यापेक्षा लहान एक्याऐंशी पुत्र पित्याच्या आज्ञेचे पालन करणारे, अतिशय विनम्र, महान वेदज्ञ आणि नेहमी यज्ञ करणारे होते. पुण्यकर्मांचे अनुष्ठान केल्यामुळे ते शुद्ध होऊन ब्राह्मण झाले होते.

भगवानृषभसं(ञ्)ज्ञ आत्मतन्त्रः(स्) स्वयं(न्) नित्यनिवृत्तानर्थ-

परम्परः(ख्) केवलानन्दानुभव ईश्वर एव विपरीतवत्कर्माण्या-

रभमाणः(ख्) कालेनानुगतं(न्) धर्ममाचरणेनोपशिक्षयन्-

नतद्विदां(म्) सम उपशान्तो मैत्रः(ख्) कारुणिको

धर्मार्थयशः(फ्) प्रजानन्दामृतावरोधेन गृहेषु लोकं(न्) नियमयत् ॥ 14॥

पूर्णपणे स्वतंत्र, स्वतः नेहमी सर्व प्रकारच्या अर्थ-परंपरांपासून मुक्त, केवळ आनंदानुभवस्वरूप, साक्षात ईश्वर असूनसुद्धा भगवान ऋषभदेव अज्ञानी लोकांप्रमाणे कर्म करीत कालानुसार प्राप्त धर्माचे आचरण करून त्यांनी त्याचे तत्त्व न जाणणाऱ्या लोकांना त्याचे शिक्षण दिले. त्याचबरोबर समचित्त, शांत, सुहृद, आणि करुणामय राहून धर्म, अर्थ, यश, संतती, भोग-सुख आणि मोक्ष हे सर्व प्राप्त करीत गृहस्थाश्रमामध्ये राहणाऱ्या लोकांना आचरणाचे धडे दिले.

यद्यच्छीर्षण्याचरितं(न्) तत्तदनुवर्तते लोकः ॥ 15॥

कारण महापुरुष जसे-जसे आचरण करतात, त्याचप्रमाणे दुसरे लोक त्यांचे अनुकरण करतात.

यद्यपि स्वविदितं(म्) सकलधर्मं(म्) ब्राह्मं(ङ्) गुह्यं(म्)

ब्राह्मणैर्दर्शितमार्गेण सामादिभिरुपायैर्जनतामनुशशास ॥ 16॥

सर्व धर्मांचे साररूप वेदाचे गूढ रहस्य ते जाणत होते, तरीसुद्धा ते ब्राह्मणांनी सांगितलेल्या विधानानुसार सामदानादी उपायांनी जनतेचे पालन करीत होते.

द्रव्यदेशकालवयः(श्)श्रद्धर्त्विग्विविधोद्देशोपचितैः(स्)

सर्वैरपि क्रतुभिर्यथोपदेशं(म्) शतकृत्व इयाज ॥ 17॥

त्यांनी शास्त्र आणि ब्राह्मणांच्या उपदेशानुसार निरनिराळ्या देवतांना उद्देशून द्रव्य, देश, काल, वय, श्रद्धा आणि ऋत्विज यांनी सुसंपन्न असे सर्व प्रकारचे शेकडो यज्ञ केले.

भगवतर्षभेण परिरक्ष्यमाण एतस्मिन् वर्षे न कश्चन
पुरुषो वाञ्छत्यविद्यमानमिवात्मनोऽन्यस्मात्-
कथञ्चन किमपि कर्हिचिदवेक्षते भर्तर्यनुसवनं(वँ)
विजृम्भितस्नेहातिशयमन्तरेण ॥ 18॥

भगवान ऋषभदेवांच्या शासनकालामध्ये या देशातील कोणताही मनुष्य आपल्यासाठी कोणाकडूनही आपल्या राजाबद्दल दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या प्रेमाशिवाय आणखी कोणत्याही वस्तूची कधीही इच्छा करीत नसे. एवढेच काय, पण कोणाच्या कोणत्याही वस्तूकडे डुंकूनदेखील पाहात नसे.

स कदाचिदटमानो भगवानृषभो ब्रह्मावर्तगतो
ब्रह्मर्षिप्रवरसभायां(म्) प्रजानां(न्) निशामयन्तीना-
मात्मजानवहितात्मनः(फ्) प्रश्रयप्रणयभरसुयन्त्रिता-
नप्युपशिक्षयन्निति होवाच ॥ 19॥

एक वेळ भगवान ऋषभदेव फिरत फिरत ब्रह्मावर्त देशामध्ये पोहोचले. तेथे मोठमोठ्या ब्रह्मर्षींच्या सभेमध्ये त्यांनी प्रजेसमोरच आपल्या समचित्त तसेच विनम्र, प्रेमळ आणि संयमी मुलांना शिक्षण देण्यासाठी पुढील उपदेश केला.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)
सं(म्)हितायां(म्) पञ्चमस्कन्धे चतुर्थोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥